जनसंपर्क कक्ष
31 MAR 2022 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचे पैलू" या ग्रंथाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. व्ही. एन. शिंदे व लेखक लक्ष्मण साठे.

# अण्णाभाऊ साठेंचे साहित्य जगाला कवेत घेणारे

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

लोकशाहीर अण्णाभाऊंच्या साहित्यातील विश्वात्मक जाणीवा महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या समग्र साहित्यात स्वातंत्र्याची प्रेरणा व शोषणाविरुद्धचा हुंकार आहे. समतावादी भूमिकेतून लिहीलेल्या या साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. त्यांच्या साहित्यातील भाषिक सौंदर्य नादावून टाकणारे आहे. जात, धर्म, प्रांत, देशाच्या भिंती ओलांडून जागतिक समुदायाला कवेत घेणारे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि अण्णाभाऊ साठे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनाचे पैलू" या डॉ. लक्ष्मण साठे लिखित ग्रंथाचे प्रकाशन आणि गुणवतं विद्यार्थ्यांचा सत्कार अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. विद्यापीठ गुणवत्ता यादी, राज्य पात्रता परीक्षा स्पर्धा परीक्षांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार केला.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, अण्णाभाऊंच्या साहित्याने आपल्याला गावकुसाबाहेरील विश्व दाखविले आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोणत्याही साहित्यकृतीच्या अर्पणपत्रिकेमध्ये नतमस्तक होण्याचा भाव असतो. लक्ष्मण साठे यांचा हा ग्रंथ म्हणजे एक उत्तम संशोधनपत्रिकाच आहे. लक्ष्मण साठे यांनी ग्रंथनिर्मितीविषयी माहिती दिली. अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राजेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.